सं.प्र.> 200904061326550001

अर्जित रजा परिगणना करण्याच्या पध्दतीत सुधारणा...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्रमांक: एसएसएन-२६९१/[१७९]/माशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ जानेवारी, १९९३.

वाचावे :- १] शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अरजा-२४८८/३९५/सेवा-९, दिनांक ९.११.१९९०.

२] शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अरजा-२४९०/१६१/सेवा-९, दिनांक १.१.१९९१.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली, १९८१ नियम १६ मधील तरतुदीनुसार, राज्यातील अशासकीय शाळांतील कर्मचा-यांच्याबाबतीत त्याने कर्तव्यार्थ व्यतित केलेल्या कालावधीच्या १/११ या दराने अर्जित रजा त्याच्या खाती जमा केली जाते, तसेच त्याने केलेल्या सेवेच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी २० दिवस याप्रमाणे अर्धवेतनी रजा त्याचे खाती जमा केली जाते. अर्जित व अर्धवेतनी रजेची याप्रमाणे परिगणना करण्याच्या सध्याच्या पध्दतीत राज्य शासनाप्रमाणे बदल करुन ती सुलभ करण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असे आदेश देत आहे की, राज्यातील अशासकीय शाळांत दीर्घसुटी विभागाव्यतिरिक्त अन्य विभागात सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्याबाबतीत त्यांच्या अर्जित व अर्धवेतनी रजा खाती यापुढे सोबत जोडलेल्या शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: अरजा-२४८८/३९५/सेवा-९, दिनांक ९.११.१९९० व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-अरजा-२४९०/१६१/सेवा-९, दिनांक १.१.१९९१ मध्ये विहित केलेल्या पध्दतीप्रमाणे अर्जित व अर्धवेतनी रजा जमा करण्यात यावी.

२. हे आदेश दिनांक १ जानेवारी, १९९३ पासून अंमलात येतील. या आदेशा-प्रमाणे रजेचा हिशेब तयार करण्यासाठी सर्व कर्मचा-यांचे दिनांक ३१.१२.१९९२ पर्यन्तचे हिशेब प्रचलित पध्दतीनुसार पूर्ण करण्यात यावेत.

३. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली, १९८१ मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदी या शासन निर्णयामधील तरतुदीपुरत्या सुधारण्यात आल्या आहेत असे मानण्यात यावे. नियमावलीतील यासंबंधीच्या नियमांमध्ये

४. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १७७१/९२/व्यय-५, दिनांक २.१२.१९९२ अन्वये, सहमती घेऊन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अ० दि० सदावर्ते ]
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे,
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक/सर्व विभागीय तंत्रशिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी,
शिक्षण निरीक्षक, उत्तर/दक्षिण/पश्चिम, मुंबई.
सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक [शिक्षण विभाग],
महालेखापाल-१ व २ [लेखा परीक्षा], मुंबई/नागपूर,
महालेखापाल-१ व २ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई,
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व जिल्हयांचे कोषागार अधिकारी,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद,
वित्त विभाग/नगर विकास विभाग/ग्राम विकास विभाग/
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग/
आदिवासी विकास विभाग/उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने,
संचालक, माहिती व जनसंपर्क यांना योग्य त्या प्रसिध्दीसाठी
निवड नस्ती, माशि-२.